62

ISSN 2394-5303

GOLDEN JUBILEE YEAR
1967-2017
१९६७-२०१७
सुवर्ण महोत्सवी वर्ष

Jr. No. 43053

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's
# Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College
Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.), PIN- 443204
NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

International Multilingual Research Journal
Printing Area
Special Issue December 2017

# Agricultural Development in India

Chief Editor:
Mr. Dnyaneshwar Vishnu Gore

IMPACT FACTOR 4.002 iijif

Scanned with OKEN Scanner

27) मराठवाडयातील शेती आणि सिंचन सुविधा: एक दृष्टीक्षेप
डॉ. एस. एन. बाबर, औरंगाबाद. (महाराष्ट्रा) ||92

28) जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास आणि नविन आर्थिक धोरण
प्रा. रविंद्र शेंडे, वरोरा, (महाराष्ट्रा) ||94

29) कृषी प्रगतीसाठी स्वामीनाथन आयोगाची गरज
प्रा. डॉ. मधुकर एस. ताकतोडे, मंगरूळपीर, (महाराष्ट्रा) ||97

30) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाययोजना
प्रा. डॉ. विष्णु पा. कुटे, नेर परसोपंत, (महाराष्ट्रा) ||100

31) करार शेतीच्या माध्यमातून कृषी विकास
डॉ. पंकज मा तायडे, पिंजर, जि. अकोला, (महाराष्ट्रा) ||103

32) स्वामीनाथन आयोग आणि कृषी विकास
श्रीमती. डॉ. जाधव मिनाक्षी भास्कर, कळंब, , (महाराष्ट्रा) ||107

33) भारतीय शेतीसमोरील आव्हाने
अनिल गंगाधर पितळे, अंजनगांव सुर्जी, (महाराष्ट्रा) ||109

34) महाराष्ट्रातील कापसाचे उत्पादन आणि उत्पादकता
प्रा.डॉ.शिवाजी पाते; परभणी, (महाराष्ट्रा) ||112

35) शेतीमालाच्या विपणनाच्या पध्दती व समस्या
डॉ. संजय आनंदा डापके, सिल्लोड,, (महाराष्ट्रा) ||115

36) भारतीय कृषी व कृषीकल्याणाची सद्यस्थिती : एक आढावा
प्रा. प्रणया महेंद्र पाटील, नंदनवन, (महाराष्ट्रा) ||119

37) शाश्वत कृषी विकास आणि काळाची गरज
डॉ. कु. सपना डी. गवई, बुलडाणा, (महाराष्ट्रा) ||122

38)शेती साधनाच्या उपलब्धतेतील नकारात्मकता
डॉ.शंकर मारोती सावंत, दारव्हा, (महाराष्ट्रा) ||126

39) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या
श्री. विद्यासागर सरदारसिंग बैनाडे, गजराज नगर, सिडको, औरंगाबाद, (महाराष्ट्रा) ||129

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research journal | December 2017 Special Issue | 094

**28**

# जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास आणि नविन आर्थिक धोरण

प्रा. रविंद्र शेंडे,
अर्थशास्त्र, विभाग प्रमुख
लोकमान्य महा.वरोरा.जि. चंद्रपूर ४४२९०७

**********

नविन आर्थिक धोरणात सर्वात दुर्लक्षित राहिलेले क्षेत्र म्हणजे ''कृषी'' क्षेत्र होय ग्रामीण विकासात कृषी क्षेत्र पूर्णपणे समाविष्ट असल्यामूळे ग्रामीण विकास २१ व्या शतकात का दुर्लक्षित होत जात आहे? याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

प्रचीन भारतात खेडी स्वयंपूर्ण होती आणि त्याचबरोबर ती आत्मनिर्भर होती. उत्पादन, वितरण व उपभोग या तिन्ही क्रिया एकाच पातळीवर पूर्ण होत असे ही पार्श्वभुमी नविन आर्थिक धोरण नष्ट करत आहे. अहिंसा, प्रेम, राष्ट्रवाद, नितीमूल्ये या सर्वांचा तारण म्हणून वापर करून भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतू स्वातंत्र्यपूर्व काळाप्रमाणेच स्वराज्यातही हे आर्थिक नि:सारण नियमीतपणे होत असल्याचे खाजगीकरण, उदारीकरण, जागतीकीकरण, टू जी स्पेक्ट्रम घोटाळा, कॉमनवेल्थ, कोळसा घोटाळा इत्यादी गोष्टीवरून कळते. परकियांच्या ऐवजी आता स्वकीयांव्दारचे संपत्तीचे आर्थिक नि:सारण होत आहे ही विषमता शेती व ग्रामीण क्षेत्राला पोषक नाही. यासाठी काटकसर, राष्ट्रवाद,सहकार, स्वदेशी, समन्वय धोक्याचे व्यवस्थापन, सत्यमेव जयते या उपाययोजना स्वातंत्र्यपूर्वकाळात आवश्यक होत्या त्या स्वराज्यातही आवश्यक आहे. थोडक्यात नविन आर्थिक धोरणाला पूर्ण विरोध न करता उत्तरआधुनिकता स्विकारून जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास पुढे नेणे आवश्यक ठरत आहे.

**संशोधनाची उदिष्टये : —**

१) नविन आर्थिक धोरण व ग्रामीण विकास यातील संबंधाचा अभ्यास करणे.

२) जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास म्हणजे काय? याचा अभ्यास करणे.

३) जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकासाला बळकट करणाऱ्या ठळक घटकांचा अभ्यास करणे.

४) आगामी ग्रामीण उदरनिर्वाहात संधीचा परिघ मोठा असण्याकरीता उपाययोजना सूचविणे.

**सर्वसमावेशक विकास : —**

सर्वसमावेशक विकास ही दीर्घकालीन क्रिया असून उत्पन्नाचे प्रत्यक्षात वितरण करण्यापेक्षा, उत्पादक रोजगार निर्मिती करणे गरजेचे आहे कारण त्यामुळे विकासापासून वंचित असणाऱ्या लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते.

**जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास : —**

'' दैनंदीन जीवनात जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण लोकांनी त्यांच्या कामकाजाच्या तसेच जीवन जगण्याच्या सवयीत अंशत: अनुकुल बदल घडवून आणणे असा अर्थ आहे. त्यात ग्रमीण भागात नविन तंत्राचा प्रसार करणे, विकासविषयक माहितीपट दाखविणे, इत्यादीवर भर देऊन ग्रामीण लोकांच्या जीवनमानात बदल अपेक्षित आहे. यावरून दैनंदीन जीवनात लोकांनी त्यांची जीवन जगण्याची व काम करण्याची पध्दत बदलविणे म्हणजे जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास होय.''

'' ज्या प्रक्रीयेमुळे ग्रामीण लोकांच्या आर्थिक, सामाजिक जीवनामध्ये सर्वांगीण सुधारणा घडवून आणली जाते त्या प्रक्रीयेला जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास असे म्हणता येईल.''थोडक्यात जास्त सर्वसमावेशक ग्रमीण विकासात लोक सहभागातून ग्रामीण क्षेत्रातील नैसर्गिक व मानवी संसाधनांचे संवर्धन विकास व कार्यक्षम वापर करून तेथील जनतेच्या जीवनमानात सदाकाळ सर्वांगीण सुधारणा घडवून आणणे होय.

**निश्चीत मागणीचे तत्व :—**

जेवढी मागणी तेवढा पुरवठा, पूर्ण रोजगार साध्य करण्यासाठी सरकारी हस्तक्षेप आजिबात आवश्यक नाही. भारतात जर शेती करण्यास पुरक व्यवसायांची जोड दिली आणि कुटिर व ग्रामीण रोजगारांचा विकास केला तर संपूर्ण लोकसंख्येला पुरेल एवढे उत्पादन, उत्पन्न याची निश्चित निर्मीती होऊ शकते. निश्चित मागणीच्या तत्वाचे समर्थन गांधीजींने केले. आपल्या

गरजा कमीत— कमी ठेवूनच व्यक्ती खऱ्या अर्थाने सूखी होऊ शकतो. जर सर्वांनी आपला उपभोग मर्यादीत ठेवला तर सर्वांना पुरेसे प्राप्त होईल ही भावना त्यामागे होती. या निश्चित मागणीच्या तत्वात नविन आर्थिक धोरणातून निर्माण झालेल्या समस्या नष्ट करण्याची ताकद आहेत शिवाय विकासात सर्वांना सामावून घेण्याचे सामर्थ्य आहे.

**कृषी शिक्षण : —**

व्यवसाय शिक्षण, प्रशिक्षण उद्योग व सेवा क्षेत्रासाठी अनिर्वाय मानले जात असून, त्यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्र निकेतन व उद्योग प्रशिक्षण संस्था मोठया प्रमाणात स्थापन करण्यात आल्या. त्यातून औद्योगीक व सेवा क्षेत्राला गरजेप्रमाणे प्रशिक्षित अधिकारी व श्रमिक उपलब्ध होत आहेत याउलट कृषी क्षेत्रासाठी असलेल्या उच्च शिक्षण संस्था व प्रशिक्षण संस्था अत्यल्प प्रमाणात आहेत परिणामी ग्रामीण निसर्ग संसाधनासंबंधी संशोधन, शिक्षण व त्याचा प्रसार होऊ शकला नाही उलट ग्रामीण भागात सामान्य ज्ञान शाखांची बीगर व्यावसायीक शिक्षण घेतलेले तरूण कृषी व पशूपालणासारख्या क्षेत्रात काम करीत आहेत. शिक्षण काळात तो पारंपारीक कृषी ज्ञानालाही मुकला व नविन अत्याधुनिक कृषी ज्ञानही त्याला नाही, अशा स्थितीत त्याची निर्णय क्षमता व समज काय असेल याची कल्पना आपण करू शकतो मनुष्यबळाच्या या विपरीत व्यवस्थापनाला तात्काळ छेद देऊन कृषी शाळा, कृषी तंत्रनिकेतने, कृषी अभियांत्रिकी पशुसंवर्धन, महाविद्यालयांचा विस्तार करावयास हवा. त्याव्दारे जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास साधता येऊ शकते.

**सहकार व सर्वसमावेशक विकास : —**

भारतीय सहकार चळवळ ही जगातील सर्वात मोठी चळवळ आहे सहकारी तत्वावर आधारीत सामाजिक, आर्थिक व संस्थात्मक सर्वसमावेशक विकास साध्य करावयाचे सहकार हे एक साधन आहे. भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकास आपल्याला हेच दर्शवितो की, विकास हा सर्वसमावेशक असेल तरच तो चिरंतन व टिकाऊ असतो. आधुनिक भांडवलशाही बाजारी अर्थव्यवस्था ही पिळवणूकीवर वाढीव मूल्य निर्माण करण्यावर व अधिकचा हव्यास यावर आधारलेली असल्यामूळे गरिब व श्रीमंत यांचे मधील दरी फार मोठया प्रमाणावर रूंदावत आहे. सामाजिक असंतोष धुमसत आहे. व सामाजिक क्रांतीची बिजे येथेच पेरली जात आहे. यातुनच नविन अर्थव्यवस्थेचा उदय होईल व ती सहकारी व समाजवादी तत्वावर आधारलेली असेल. नविन आर्थिक धोरणात माणुस मनपासून दूर चालला आहे. तो जवळ येण्यासाठी व स्नेहबंध वृध्दींगत होऊन सर्वसमावेशकता जोपासण्यासाठी सहकाराचीच निश्चितपणे मदत होईल.

**वैश्विक सहकार संस्कृती: —**

जागतीक पातळीवरील उपभोगाची घसरण थोपविण्यासाठी वैश्विक सहकार हे एक महत्वाचे पाऊल ठरू शकेल गरीब राष्ट्रामध्ये मोठया प्रमाणावर सामाजिक खर्चात गुंतवणूकीच्या माध्यमाने वाढ झाल्यास जागतिक अर्थव्यवस्थेला चालना मिळून सर्वसमावेशक आर्थिक विकास साध्य करण्यास मदत होऊ शकेल. कामगार, शेतकरी यांनी संघटीत होणे आवश्यक आहे. नविन आर्थिक धोरणानंतर अशा संघटना लुप्त झाल्याने शासन, खाजगी उद्योजक यांच्या कार्यपध्दतीवर अंकूश राहिला नाही. बदलत्या परिस्थितिने सहकार क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य देण्याची आवश्यकता पुन्हा निर्माण झाली आहे. सहकार क्षेत्राचा विकास एका विशिष्टयं प्रदेशापुरता किंवा राज्यापुरता मार्यादीत न राहता सहकारी संस्कृती सर्वत्र रूजविणे आवश्यक आहे.

**पंचायत राज आणि ग्रामीण विकास : —**

लोकशाही शासनप्रणालीत पंचायत राज व्यवस्थेस अनन्य साधारण महत्व आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाची त्रिस्तरीय पध्दती म्हणजे पंचायत राज पध्दती होय. पंचायत राज पध्दतीस स्थानिक स्वराज्य संस्था असेही म्हणतात. भारतात पंचायत राज पध्दती '' स्थानिक प्रशासन पध्दती'' या नावाने ओळखली जाते. भारतात पंचायती राज व्यवस्था सुरू व्हावी, खेडयांतील स्थानिक पातळीवर व्यक्तींचा त्यात सहभाग असावा असे महात्मा गांधीनी आग्रही प्रतिपादन केले इ.स. १८८२ मध्ये लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेची संकल्पना सर्वप्रथम मांडली आणि स्थानिक

स्वराज्य संस्थेचा कायदा भारतात संमत केला म्हणून त्यांना भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक म्हटले जाते. पंचायत राज व्यवस्थेचा स्वातंत्र्यानंतरचा इतिहास बघितल्यास पुढील सुधारणा आवश्यक ठरत आहे.

१) पंचायत राज संस्थांना अधिक स्वायत्ता मिळणे आवश्यक आहे. केवळ राज्य सरकारचे मध्यस्थ म्हणून त्यांना काम करावे लागू नये.

२) पंचायत राज व्यवस्थेतील विविध संस्थात संघर्ष, मतभेद असता कामा नये. ते दूर करावेत.

३) निर्वाचित पदाधिकारी व प्रशासन यांच्या सालोख्याचे संबंध असावेत.

४) राज्यसरकारकडून निश्चित मागणीचे तत्व पूर्ण होणार ऐवढे आर्थिक अनुदान मिळणे गरजेचे आहे

५) पंचायत राज व्यवस्था लोकाभिमुख होईल या दिशेने प्रयत्न जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकासात अपेक्षित आहे.

**आगामी ग्रामीण उदरनिर्वाह: —**

भारताला एक दर्जेदार ग्रामव्यवस्थेचा वारसा मिळाला आहे ग्रामव्यवस्थेतील दोष प्रसिध्द आहेत पण ज्यांचे निर्मूलन होऊ शकणार नाही असा एकही दोष नाही या संस्कृतीचे उच्चाटन करून तिच्याजागी शहरी संस्कृती स्थापन करणे अशक्य आहे. ग्रामप्रधान संस्कृतीशिवाय तरणोपाय नाही हे लक्षात घेऊन तिच्यातील दोषांचे निवारण करण्याचे प्रयत्न करावयाचे आहे, युवकांनी होणारे नुकसान ओळखल्यास राष्ट्रनाश थांबेल व सुदृढ आगामी ग्रामीण उरनिर्वाह बनेल. भारतीय शहरांकडे पहा, युरोपकडे पहा कोणीही सुखा — समाधानात आढळत नाही. कसलीही गती म्हणजे प्रगती नव्हे.

भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर आज दोन मार्ग खुले आहे. '' बळी तो कान पिळी'' आणि सत्यमेव जयते'' यापैकी ' सत्यमेव जयतेचा'' आधार वापरल्यास आगामी ग्रामीण उदरानिर्वाहात सर्वसमावेशकता निर्माण होईल. थोडक्यात ''सत्यमेव जयते'' हा ग्रामीण उदरनिर्वाहाचा आधार ठरू शकणार अशी कृती आवश्यक आहे.

उत्तर आधुनिकतेत नविन आर्थिक धोरण व

**ग्रामीण विकासाचा मेळ: —**

अलीकडील जागतिकीकरण उदारीकरण आणि खाजगीकरणानंतरचा काळ उत्तर आधुनिकतेचा काळ म्हणून गणला जातो. नावावरूनच तो आधुनिकतेच्या विरोधात वा आधुनिकतेपेक्षा भिन्न असला पाहिजे ही गोष्ट स्पष्ट होते. साधारणत: १९७० पासून साहीत्य, कला, संस्कृती तसेच सामाजिक शास्त्रे व तत्वज्ञान यात उत्तर आधुनिकता हा परवलीचा शब्द झाला आहे. फेडरीक जेमसन (१९९१) यांच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अलीकडील वळणाचा सांस्कृतिक आविष्कार म्हणजे उत्तर आधुनिकता होय.

भौतीकतेबरोबर अभौतीकतेचा विचार उत्तर आधुनिकवादात आहे. उत्तर आधुनिकवादाचा विचार असाच पुढे व्यापक झाल्यास,परंपरावादी व आधुनिकतेचा समग्र विचार नविन युक्तांना जन्म देईल आणि आर्थिक विकास मोठा होणार हयात शंका नाही. परंपरावादी साधने टाकाऊ नाही असा युक्तीवाद उत्तर आधुनिकता स्पष्टपणे सांगते व नविन साधनांना अधिक बळकटी आणण्यासाठी जून्या आदानांचा वापर आवश्यक आहे. उत्पादन फलन अधिक मजबूत बनिविण्यासाठी उत्तर आधुनिकवाद स्विकारणे आवश्यक आहे. उदा. व्यापारी बॅकांचे जाळे वाढवत असतांना आपण सहकार तत्व मजबूत करीत आहो, ग्रामीण क्षेत्राच्या विकासाबरोबर उद्योग आणि सेवाक्षेत्राचा पर्यायानी शहरांचा विकास, नवयुवकांना रोजगार संधी उपलब्ध करून देतांना वयोवृध्द वर्गाचा आपण विचार करीत आहो हा सर्व प्रयत्न उत्तर आधुनिकतेत समाविष्ट आहे. जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास व शाश्वत विकासाला उत्तर आधुनिकवादाचा पाठींबा मिळणे आवश्यक आहे.

**सर्वसमावेशक विकासासाठी धोक्याचे व्यवस्थापन: —**

आपत्ती आणि विकास यांचा जवळचा संबंध आहे. दशकानुदशके केलेला विकास एखादी आपत्ती क्षणार्धात फस्त करून टाकते. दुसरे म्हणजे विकासाचा अभाव कमकुवत समाजाला आपत्तीच्या धोक्यात जखडून टाकतो. तिसरे म्हणजे विकास आपत्तीच्या नव्या धोक्यांना जन्माला घालतो. उदा. खाणकाम व



Scanned with OKEN Scanner

उद्योगक्षेत्रे संवेदनशील परिसंस्थेमध्ये उभारल्याने पर्यावरणाला धोका संभवतो.

मानवी असो वा नैसर्गिक धोके निवारणासंबंधी भारतात पारंपारीक ज्ञान, समजउमज त्याचप्रमाणे शास्त्रोक्त ज्ञानाचाही भरपूर साठा आहे परंतु अशा ज्ञानाचा पर्याप्त उपयोग करणे आवश्यक आहे. थोडक्यात जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकासाला धोक्याच्या व्यवस्थापनाची गरज आहे.

**समारोप: —**

नविन आर्थिक धोरण चुकीचे आहे असा युक्तीवाद वाढविणे सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी योग्य नाही. पंचायतराज व्यवस्था, सहकार, कार्य—संस्कृती, सदकाळ सीमांत हरीतक्रांती, कृषी शिक्षण,गरीबीचे दृष्टचक्र नष्ट, निश्चित मागणीचे तत्व, विकासासाठी धोक्याचे व्यवस्थापन, टिकाऊ स्वरूपाची अर्थवृध्दी अशा विविध साधनांचा वापर करून उत्तर आधुनिकता व ग्रामीण विकासात मेळ घातल्यास आगामी ग्रामीण उदरनिर्वाह ''सत्यमेव जयते'' या घोषवाक्यावर केंद्रीत राहतील. यातूनच जास्त सर्वसमोवशक ग्रामीण विकास साध्य होईल हे उघड आहे.

**संदर्भ : —**

१) योजना, जाने २०१७.
२) अर्थसंवाद, जाने — मार्च २०१५ खंड ३८
३) कुरूक्षेत्र, हिंदी मासिक.
४) माझ्या स्वप्नांचा भारत (संक्षिप्त) परंधाम आश्रम पवनार.
५) नियोजन आणि समृध्दी — गंगाधर गाडगीळ.
६) विकासासाठी धोक्याचे व्यवस्थापन — डॉ. पी. जी. धर चक्रवती.

**29**

# कृषी प्रगतीसाठी स्वामीनाथन आयोगाची गरज

प्रा. डॉ. मधुकर एस. ताकतोडे
सहयोगी प्राध्यापक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान
महाविद्यालय, मंगरूळपीर, जि. वाशिम

**********

भारतीय अर्थव्यवस्था आजही कृषी अर्थव्यवस्था आहे. भारतात उदरनिर्वाहासाठी ग्रामीण भागातील ६५ ते ७० टक्के जनता कृषी व कृषी व्यवसायाशी निगडीत आहे. कालांतराने मानवी प्रगती बरोबरच देशातील कृषी उत्पादन पध्दतीतही बदल व प्रगती पहायला मिळत आहे. शेती हा देशाच्या विकासाचा आत्मा असल्याने कृषी विकासाकरिता शासनामार्फत विशेष प्रयत्न केले जात आहेत. तसेच कृषी प्रगती बरोबर कृषीविषयक नवनवीन समस्या समोर येत आहेत. या समस्या निवारणाकरिता शासनामार्फत विविध अभ्यासगट कार्य करीत आहेत. तसेच कृषी या क्षेत्राचा महत्त्वाचा घटक म्हणजे कृषक किंवा शेतकरी होत. या घटकामार्फत कृषी विषयक विविध उत्पादन कार्य पार पाडले जाते. मात्र सद्यस्थितीत देशातील कृषी व कृषक या घटकांकडे शासनस्तरावर विशेष लक्ष टेणे गरजेचे आहे.

भारत जी आज विकासाची पातळी गाठण्यासाठी गती प्राप्त करीत आहे त्यामध्ये या दोन घटकाकडे दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास येत आहे. हे आपणास देशातील विविध कृषीविषयक समस्या तसेच शेतकरी आंदोलनावरून दिसून येत आहे. त्यासाठी नुकताचशेती वशेतकरी या दोघांच्या शास्वत विकासासाठी डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली १८ नोव्हेंबर २००४ रोजी स्वामीनाथन आयोगाची स्थापना करण्यात आली. व ४ ऑक्टोबर